Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

मुघलकालीन महत्वाकांक्षी साम्राज्ञी - नूरजहान

गव्हाणे के. जी.
(असो.प्रोफेसर) ,इतिहास विभाग प्रमुख,एस.पी. महाविद्यालय भूम .

प्रास्तविक :-

मध्ययुगीन मुघल कालखंडात जहांगीरच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाची घटना म्हणून इतिहासकार जहांगीर-नूरजहान विवाहाचा उल्लेख करतात. इ.स.१६११ मध्ये जहांगीर - नूरजहान (मेहरून्निसा) विवाह झाला. जहांगीरचा नूरजहानसी विवाह झाल्यानंतर त्याची कारकीर्द म्हणजेच नूरजहानचीच कारकीर्द समजली जाण्यास सुरूवात झाली. याविषयी 'तातीमा -इ-वाकियात-ए-जहांगिरी' चा ग्रंथलेखक मुव्हडी म्हणतो, ''मुघल साम्राज्यातील संपूर्ण घडामोडी नूरजहानच हाताळत होती. तिच्या नावे खुतबा वाचणेच शिल्लक राहिले होते. एरवी ती अनियंत्रित सत्ताधिशच होती.'' [१] थोडक्यात जहांगीर-नूरजहानच्या विवाहामुळे जहांगीरच्या वैयक्तिक जीवनावरच परिणाम झाला असे नसून बादशहा या नात्याने त्याचे जे राजकीय जीवन होते त्यावरही नूरजहानच्या विलक्षण व्यक्तिमत्वाची छाप पडली. मध्ययुगीन भारतामध्ये नूरजहान नावाभोवती जे अद्भूत वलय निर्माण झाले तसे दुसऱ्या कोणत्याही नावाभोवती निर्माण झाले नसेल. त्यामुळे नूरजहानच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास केल्याशिवाय जहांगीरच्या कारकीर्दीचे मर्म समजणार नाही.

नूरजहानचे पूर्वचरित्र

मुताबतखान यांच्या 'इक्बालनामा-ए-जहांगिरी' या ग्रंथावरून नूरजहानच्या पुर्वचरित्राची माहिती उपलब्ध होते. नूरजहान ही मिर्झा घियासबेग या मूळ पर्शियाची राजधानी तेहरानच्या रहिवाशीची मुलगी होय. मिर्झा घियासबेग याचे वडील ख्वाजा मुहम्मद शरीफ हे पर्शियाच्या राजा शाह तहमास्प सफावी यांच्याकडे वजीर म्हणून नोकरीस होते. इ.स. १५७७ मध्ये ख्वाजा मुहम्मद शरीफ याचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर मिर्झा घियासबेग आपल्या संपूर्ण कुटूंबासह भारतात आला, ज्यात त्याची गरोदर पत्नी अस्मत बेग, दोन मुले आणि मुलगी यांचा समावेश होता. मिर्झा घियासबेग भारताकडे येत असताना कंदहार मुक्कामी इ.स.१५७८ मध्ये त्याची गरोदर पत्नी बाळंत होऊन तिने ज्या मुलीला जन्म दिला तिचे नाव मेहरून्निसा असे ठेवण्यात आले. २ मिर्झा घियासबेग लाहोरला आल्यानंतर त्याने फत्तेपूर सिक्री येथे सम्राट अकबराची भेट घेऊन त्याच्या दरबारात नोकरी मिळवली. पुढे तो आपल्या कर्तबगारीने अकबराचा विश्वासू नोकर बनून बादशहाच्या दिवाण पदापर्यंत पोहचला.

मुघल सम्राट अकबराच्या दरबारी मिर्झा घियासबेगचे महत्व वाढत असतानाच त्याची मुलगी मेहरून्निसा हिचे सौंदर्य आणि वय वाढत होते. साहजिकच राजपुत्र सलीम तिच्यावर मोहित झाला आणि तीही अतिशय महत्वाकांक्षी असल्यामुळे डॉ. श्रीवास्तव आपल्या 'The Mughal Empire' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे ती युवराजाच्या हृदयसिहांसनाची साम्राज्ञी होण्याची महत्वाकांक्षा बाळगून बसली. "Peerless in deauty and unrivalled in feminine accomplishments, she (Mehr-un-nisa) aspried to conquest of the heir appareut, prince Salim, who ardently desired to marry her." [३] परंतु सम्राट अकबराला सलीम-मेहरून्निसा लग्न होणे पसंत नव्हते. त्याने घ्अलीकुली बेगङ नावाच्या एका इराणी सरदाराशी तिचे लग्न लावून दिले. त्यावेळी मेहरून्निसा १७ वर्षे वयाची होती. जहांगीर बादशहा झाल्यानंतर अलिकुली बेग याला मनसबदारी देऊन घ्एतमादउद्दौलाङ असा किताब दिला व त्याची बंगालच्या सुभ्यावर नेमणूक केली.

जहांगीर - मेहरून्निसा विवाह- मे १६११

अलीकुली बेग हा शेर अफगाण या नावानेही परिचित आहे. इ.स. १५९९ मधील मेवाडवरील स्वारीच्या वेळी अलीकुली बेग यांने एकट्याने सिंहाची शिकार केल्याने त्याच्या पराक्रमाबद्दल युवराज सलीम यानेच त्याला घ्शेर अफगाणङ ही पदवी दिलेली होती. सलीमने अकबराच्या विरूध्द बंड केल्यानंतर अलीकुली बेग याने अकबराची बाजू उचलून धरली होती. जहांगीर बादशहा (सलीम) झाल्यानंतर त्याने अलीकुली बेगची बंगालच्या सुभ्यावर फौजदार म्हणून नेमणूक केली होती. बंगालचा सुभेदार म्हणून काम पहात असताना शेर अफगाण स्वतंत्र वृत्तीने वागू लागला. ऑगस्ट १६०६ रोजी बंगालचा राज्यपाल कुतुबुद्दीन कोका आणि शेर अफगाण यांच्यात बेबनाव होऊन शेर अफगाण यांनी कुतुबुद्दीनला तर कुतुबुद्दीनच्या अंगरक्षकांनी शेर अफगाणला ठार केले (शेर अफगाणच्या मृत्युविषयी इतिहासकारात मतभेद

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

आहेत; जहांगीरने आपल्या हस्तका करवी शेर अफगाणचा वध केला तर काहींच्या मते, शेर अफगाण कुतुबुद्दीन कोका याच्याशी लढा देताना मारला गेला.)

शेर अफगाणचा मृत्यू झाल्याने मेहरून्निसा विधवा झाली. जहांगीर यांनी मेहरून्निसाला तिच्या लहान मुलीसहीत आपल्या लष्करी अधिकाज्याकरवी आग्राला आणले. शेर अफगाण पासून मेहरून्निसाला घ्लाडली बेगमङ ही मुलगी झालेली होती. जहांगीरने पुढे मे १६११ मध्ये विधवा मेहरून्निसाबरोबर विवाह केला. त्यावेळी जहांगीर ४२ वर्षाचे तर मेहरून्निसा ही ३४ वर्षाची होती. [४] जहांगीरने तिला घ्नूरमहलङ ,घ्नूरजहानङ , घ्जगाचा दीपङ , घ्राजवाड्यातील दीपङ अशा पदव्या देऊन तिला आपली पट्टराणी बनविले. जहांगीर-नूरजहान यांच्या विवाहामुळे मुघल इतिहासाला वेगळी कलाटणी मिळाली.

नूरजहानची कारकीर्द (इ.स.१६११ ते १६२७)

नूरजहानने आपल्या स्त्री-सौंदर्याने जहांगीरच्या केवळ हृदयातच प्रवेश मिळविला असे नसून त्याच्यावर राज्य असे म्हटले तर वावगे ठरू नये. परंतु नूरजहानला हे स्थान केवळ तिच्या सौंदर्याच्या आधारावरच मिळाले होते असे नसून तिच्याकडे असणारी कमालीची आकलन शक्ती, कुशाग्र बुध्दी, अष्टपैलु व अष्टावधानी स्वभाव आणि त्याच्या जोडीला असलेले भक्कम व्यवहारज्ञान यांचाही त्यात वाटा होता. पर्शियन भाषा व साहित्य यांची ती चांगली जाणकार होती.[५] जहांगीरच्या विवाहावेळच्या नूरजहानच्या सौंदर्याचे डॉ. डी.एल.श्रीवास्तव यांनी आपल्या 'The Mughal Empire' ग्रंथात वर्णन करताना म्हटले आहे,च्या प्रौढवस्थेतही मेहरून्निसा दिसावयास अत्यंत सुंदर होती. वयाबरोबर तिचे सौंदर्यही जणू वृध्दिगंत होत होते." [६] जहांगीर हा कमालीचा व्यसनी असल्याने त्याच्या व्यसनप्रियतेमुळे त्याचे राज्यकारभारावरून लक्ष उडाले. परिणामी मुघल साम्राज्याची सत्तासुत्रे त्याची पत्नी नूरजहानच्या हातात केंद्रित झाली. त्यादृष्टीने इ.स.१६११ ते १६२७ हा कालखंड नूरजहारच्या सत्तेचा व प्रभावाचा मानला जातो. नूरजहानच्या कारकीर्दीचे दोन भाग पडतात.

पहिला कालखंड (इ.स.१६११ ते १६२१)

नूरजहानच्या अंगी वसत असलेले गुण लक्षात घेऊन आणि राज्यकारभार व प्रशासन व्यवस्था पाहण्यास ती समर्थ आहे हे जाणून उत्तरोत्तर राज्यकारभाराची व प्रशासनव्यवस्थेची सर्व सुत्रे तिच्या हवाली करून जहांगीर निश्चित झाला. स्वतः जहांगीर म्हणतो, च्मी बादशाही बेगम नूरजहानच्या हवाली केली आहे. एक सुरईभर मद्य आणि अर्धा शेर मांस या व्यतिरिक्त मला आणखी काहीही नको. [७] थोडक्यात जहांगीरवर नूरजहानच्या वर्चस्वाचा पूर्ण पगडा बसला आणि साहजिकच तिच्या अधिकारातही वाढ झाली. याविषयी आधुनिक भारताचा इतिहास या ग्रंथात डॉ. सरकार म्हणतात, च्राज्यकारभारात तिचे वर्चस्व वाढू लागले आणि जहांगीर तिच्या हातातील बाहुले बनला."

नूरजहानला मुळातच राजकारणाची आवड असल्याने तिने जहांगीर बरोबरच राज्यकारभाराची सुत्रेही आपल्या हाती घेतली . राजकारणात आपले वर्चस्व वाढविण्याच्या दृष्टीने नूरजहानने आपल्या मर्जीतील लोकांचा एक शक्तीशाली गट बनविला. या गटाला घ्नूरजहान जूटाङ या नावाने ओळखले जाते. या गटात नूरजहानची आई आस्मत बेगम (अत्तराची अविष्कारकर्ती), वडील मिर्झा घियासबेग, भाऊ आसफ खान आणि आसफखानची मुलगी म्हणूजेच नूरजहानची भाची अर्जुमंदबानू बेगम (पुढील काळातील मुमताज महल) तिचा राजपुत्र खुर्रम (शहाजहान) याच्याशी विवाह झाल्याने तोही या गटात सामील झाला. या सर्वांच्या मदतीने आणि सहकार्याने नूरजहानने राज्यकारभारावर आपले वर्चस्व निर्माण केले. नूरजहानने स्वतःच्या नावाने नाणी पाडली तसेच सर्वशाही फर्मानांवर राजाच्या सही-शिक्क्यांबरोबर नूरजहान बेगम हिची देखील सही होऊ लागली. म्हणजेच जहांगीर नामधारी सत्ताधीश बनला व जहांगीरची कारकीर्द म्हणजे खज्या अर्थाने नूरजहानचीच कारकीर्द सुरू झाली.

नूरजहानची आई अस्मत बेगम ही तिची प्रमुख सल्लागार होती. मिर्झा घियासबेग (एतमादउद्दौला) हे नूरजहानचे आधारस्तंभ असून त्यांना १४,००० सैन्याची मनसबदारी व साम्राज्याचे वजीरपद नूरजहानने मिळवून दिले.[८] आसफखान हा नूरजहानचा भाऊ असून त्यालाही नूरजहानच्या कृपेने १२,००० सैन्याची मनसब देण्यात आली. तसेच नूरजहानने आपल्या काही नातेवाईकांना सन्मानाच्या जागी विराजमान केले. नूरजहानला युध्दकला, शस्त्रकला व शिकार करणे इत्यादी मध्ये सहभाग घेणे आवडत होते. नूरजहानने आपल्या पतीपासून (शेरअफगाण) झालेल्या घ्लाडली बेगमङ या मुलीचा विवाह जहांगीरला एका रखेलीपासून झालेल्या त्याच्या सर्वात लहान पुत्राशी घ्शहरियारशीङ एप्रिल १६२१ मध्ये करण्यात आला.[९] या विवाहाने नूरजहानच्या गटाचे राजकीय अस्तित्व धोक्यात आले.

दुसरा कालखंड (इ.स.१६२२ ते १६२७ पर्यंत)

पहिल्या कालखंडात नूरजहानच्या गटाने यशस्वी राज्यकारभार केला. परंतु दुसज्या कालखंडात तिच्या गटाच्या वर्चस्वास तडे जाण्यास सुरूवात झाली. इ.स.१६२१ मध्ये तिची आई अस्मत बेगम व इ.स.१६२२ मध्ये तिचे वडील मिर्झा घियास बेगचा मृत्यू झाला. नूरजहानने आपल्या मुलीचा विवाह शहरियारशी लावून दिल्यामुळे तिने त्याला जहांगीर नंतर सत्तेवर आणण्याची खेळी सुरू केल्याने तिचा भाऊ आसफखान व खुर्रम (शहाजहान) दोघेही तिचे कट्टर विरोधक बनले. खुर्रमने नूरजहानशी उघड उघड बंड केले. तेव्हा खुर्रमचे बंड मोडण्यासाठी नूरजहानने महाबतखानाला जवळ केले. त्यामुळे महाबतखानाचे महत्व वाढू लागले. त्यामुळे धुर्त नूरजहानने महाबतखानाचा काटा काढण्यासाठी कट रचला. हा कट उघडकीस आल्याने महाबत खानाने उलट तिच्या विरूध्द उठाव केला. राजपुत्र खुर्रम आणि सेनापती महाबतखान यांनी यावेळी बंडाळ्या केल्याने यादवीयुध्दाचे स्वरूप तेथील राजकारणाला मिळाले.१० अशा राजकीय तणावाच्या

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

वातावरणातच इ.स.१६२७ मध्ये जहांगीर बादशहा मरण पावला. नूरजहान एकाकी पडली. जहांगीरच्या मृत्युने नूरजहानचे अस्तित्व संकटात आले. तिचा भाऊ आसफखान याने खुर्रमची बाजू (शहाजहान) घेतल्याने तो सत्ताधिश झाला. शेवटी तिला शहाजहानला शरण जावे लागले. आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस तिने लाहोर येथे घालविले. इ.स.१६४५ मध्ये ती मरण पावली आणि एक अत्यंत महत्वाकांक्षी व सत्ताभिलाषी जीवनाचा अंत झाला.

नूरजहानची योग्यता

नूरजहान ही सुंदर रूपवती, कुशल राजनीतीज्ञ व महत्वाकांक्षी बेगम असून तिने आपल्या सौंदर्याच्या जोरावर जहांगीरवर विलक्षण प्रभाव निर्माण केला. नूरजहानच्या सहवासात जहांगीर स्वत:चे राज्यकर्तव्य विसरला होता. नूरजहानने आपल्या सौंदर्याच्या जोरावर इ.स.१६११ ते १६२७ पर्यंत दिल्लीच्या राजसिंहासनावर, राज्यकारभारावर स्वत:चे वर्चस्व निर्माण केले. नूरजहानला दाग-दागिणे व नवनवीन कपड्यांची अतिशय आवड होती. गोरगरिब-दीन दुबळ्याबद्दल तिला सहानुभूती होती. संगीत, चित्र व काव्य इत्यादींची तिला आवड असून स्त्रियांच्या हिताच्या अनेक योजना तिने आखल्या होत्या. ती स्वत: सुसंस्कृत व विद्वान असल्याने तिने अनेक कलाकारांना आश्रय दिला. तिच्या कारकीर्दीत पाचशे अनाथ मुलींचे विवाह तिने स्वखर्चाने लावून दिले. तसेच तिला मिळणाज्या पेन्शनमधील बराच हिस्सा तीने दानधर्म करण्यात खर्च केला. सम्राट जहांगीरच्या मृत्यूनंतर तिने आपले जीवन अत्यंत साधेपणाने व्यतीत केले. नूरजहानच्या महत्वाकांक्षी स्वभावाने तिचे राजकारणातील वर्चस्व संपुष्टात आले. तरीही मध्ययुगीन कालखंडातील एक महत्वाकांक्षी स्त्री म्हणून तिचे हिंदुस्थानच्या इतिहासातील महत्व गौरवास्पद आहे. इ.स.१६४५ मध्ये लाहोर येथे तिचे निधन झाले. तिचे दफनही जहांगीरच्या कबरी जवळच (लाहोरच्या शालीमार बागेत) करण्यात आले. अशा रितीने एका अत्यंत महत्वाकांक्षी व सत्ताभिलाषी जीवनाचा अंत झाला.

संदर्भसूची :

१. बिरादार टी.के. - मोगलकालीन भारत, रत्नदीप बुक सेंटर, उदगीर, आवृत्ती पहिली १९९५, पृ.क्र.२०१
२. सतीशचंद्र (अनु. क्षीरसागर एस)- मध्ययुगीन भारत, के सागर पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीय आवृत्ती २०१० पृ.क्र. ३०७
३. केशट्टीकर के.मु - मध्ययुगीन भारत, पडगिलवार प्रकाशन नागपूर, तृतीय आवृत्ती-१९७४, पृ.क्र.२३७
४. कठारे अनिल - मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती, १ जानेवारी २०१३, पृ.क्र. ४३८.
५. मेहता जे.एल. (अनु.देशपांडे व.तु.) - मध्ययुगीन भारताचा बृहत् इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००७, पृ.क्र. ४०७.
६. केशट्टीवार के.मु.- पुर्वोक्त, पृ.क्र. २३९
७. आचार्य धनंजय- मध्ययुगीन भारत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती जुलै २००८, पृ.क्र.३४४
८. गाठाळ एस.एस. - मोगलकालीन भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती जुलै २०१०, पृ.क्र. ३४४.
९. कुलकर्णी, नेवासकर - मध्ययुगीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती-२००९ पृ.क्र.२०९
१०. कोलारकर श.गो. - मध्ययुगीन भारताचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती-२०० पृ.क्र. २०९.